**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**निशाणी १५**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – महादेव अभिनाथ घागरे

माझे वय – ३३ वर्षे,

व्यवसाय – पो.कॉ. १७८

रा.ने. – मालवण पोलीस स्टेशन

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता श्री. चव्हाण यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

०१. दि. १४/१२/२०२३ रोजी माझी मालवण पोलीस स्टेशन येथे नेमणूक होती. दि. १४/१२/२०२३ रोजी पोलीस निरिक्षक यांच्या आदेशानुसार मी, एपीआय सोनवलकर, पोहेका पेडणेकर, पोकॉ जाधव, चालक पाटील असे वाहन क्र. एमएच–१२–एसक्यू–२०२८ ने मसुरे दुरक्षेत्र येथे गेलो होता. त्या ठिकाणी पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरिक्षक कोल्हे, सहाय्यक पोलीस निरिक्षक जाधव, पोलीस उपनिरिक्षक झांझुर्णे, पोहेकॉ नाईक, पोना ढोले, चालक जंगले, पोलीस हवालदार कडूलकर व पोलीस शिपाई गवाणकर हजर होते. पोलीस विभागीय अधिकारी यांनी नदीपात्रातून वाळू उपसा करणाऱ्या वाहनावरती कारवाई करावयाची आहे असे सांगितले. संध्याकाळी ६.०५ सरकारी वाहन व खाजगी वाहनाने भगवंतगड खाडीपात्राच्या दिशेने जात होतो. आम्ही जात असताना भगवंतगड दुध डेअरीच्या पुढे भगवंतगडाच्या दिशेने एक डंपर दिसला. त्यास पोलीस उपनिरिक्षक झांझुर्णे यांनी हात दाखवून थांबविण्याचा प्रयत्न केला. सदरचा डंपर न थांबता पुढे निघून गेलो. आम्ही आमच्या वाहनाने सदर डंपरचा पाठलाग केला. सदर डंपरला संध्याकाळी ६–४७ वा. भगवंतगड दुध डेअरीच्या जवळ पकडले होते. मी व झांझुर्णे यांनी सदर वाहनाच्या परवान्याबाबत विचारले होते. त्यांनी त्याच्याकडे कुठलेही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले. सदर डंपर चालकाला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव समीर श्रीरामसुंदर मालोंडकर असे सांगितले. सदर डंपरमध्ये १५,०००/– रक्कमेची वाळू भरलेली होती. सदर ठिकाणी सुदेश तांबे यांनी पंचनामा केला होता. पकडलेल्या डंपरचा क्रमांक एमएच–०७–सी–५५४५ असा होता. त्यानंतर मी

पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दाखल केली होती. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. मी दाखल केलेली फिर्याद हीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. पी.१/पीडब्ल्यू १** दिली आहे. मला डंपरचा चालक दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो. आजरोजी डंपर चालक न्यायालयासमक्ष हजर आहे. साक्षीदाराने आरोपी क्र. १ समीर यास न्यायालयासमक्ष डंपर चालक म्हणून ओळखले. .

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.कुलकर्णी यांचे मार्फत.**

०२. मसुरा पोलीस स्टेशन येथून आम्ही संध्याकाळी ६.०५ वा. निघालो होतो. आम्ही बेळणे–आचरा मार्गे मसुरे येथून भगवंतगडाकडे गेलो होतो. मसुऱ्यापासून बेळणे पर्यंतचे अंतर किती आहे हे मला सांगता येणार नाही. मला बेळणे ते आचरा यामध्ये किती अंतर आहे हे मला सांगता येणार नाही. आचरा तिठा ते भगवंतगड तिठा यामधील अंतर दोन कि.मी. आहे. हे मला सांगता येणार नाही की, मसुरे ते बेळणे यामध्ये १० कि.मी., बेळणे ते आचरा १४ कि.मी व आचरा तिठा ते भगवंतगड तिठा यामध्ये ४ कि.मी. अंतर आहे. भगवंतगड तिठा पासून भगवंतगड डेअरी २ कि.मी.अंतरावर आहे. मला भगवंतगड डेअरीचा ग्रामपंचायत घर क्र. किती आहे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ साली भगवंतगड डेअरी कधीही अस्तित्वात नव्हती. मी सन २०२३ साली भगवंतगड डेअरी अस्तित्वात होती ही बाब दर्शविण्यासाठी पुरावा हजर करु शकतो. मी भगवंतगड डेअरी ही चिंदरमध्ये येते अथवा भगवंतगड मध्ये येते याबाबत मी खात्री केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, चिंदर भगवंतगड रस्त्यावरती व आचरा तिठा ते भगवंतगड रस्त्यावरती दुकाने व लोकांची घरे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, घरे आहेत, दुकाने नाहीत. भगवंतगड डेअरीचे मालक कोण आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, भगवंतगड डेअरी अस्तित्वात नसल्यामुळे मला त्याच्या मालकाचे नाव सांगता येत नाही.

०३. हे मला सांगता येणार नाही की, आम्हाला किती अंतरावरती असताना डंपर दिसला होता. हे मला सांगता येणार नाही की, झांझूर्णे आम्ही जात असलेल्या वाहनामध्ये कुठे बसलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठल्याही वाहनातून तथाकथित घटनेच्यावेळी प्रवास करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, झांझुर्णे यांना तथाकथित डंपर कधीही मिळून

अथवा दिसून आला नव्हता. मी माझ्या मोबाईलमध्ये डंपरचे व्हीडीओ शुटींग केले नव्हते. मी फिर्याद देण्यापुर्वी झांझुर्णे यांना व्हीडीओ शुटींग केले आहे का याबाबत विचारले नव्हते. माझ्या पाहण्यामध्ये डंपरचे कुठलेही व्हीडीओ शुटींग आलेले नाही.

०४. फिर्याद देताना डंपर किती वाजता दिसला होता ही बाब सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनास्थळाच्या आजूबाजूला अनेक लोकांची घरे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्या ठिकाणी एकच घर आहे. मला सदर घर कुणाचे आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनास्थळाच्या परिसरामध्ये संजय खोत, किशोर खोत, बाळा पाटणकर, यशवंत खोत व बाबू माळगावकर यांची घरे आहेत. तथाकथित घटनेच्या वेळी त्या ठिकाणी कोणीही आले नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, तथाकथित डंपर थांबविल्यानंतर त्या ठिकाणावरुन कुठले कुठले वाहन जात होते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनास्थळावरती डंपर होता ही बाब दर्शविण्यासाठी माझ्या शब्दाशिवाय माझ्याकडे कुठलाही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनेच्या वेळेस आरोपी डंपर चालवत होता व मी त्यास पाहिले होते असे कधीही घडले नव्हते. आरोपी क्र. १ गाडी चालवत असताना त्याबाबतचे मोबाईलवरती शुटींग मी केले नाही, इतरांनी शुटींग केले होते किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेच्या कालावधीमध्ये अनाधिकृतपणे वाळू उपसा केला जात आहे अशा लोकांकडून तक्रारी प्राप्त होत होत्या व त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये बातम्याही प्रसिध्द केल्या जात होत्या. हे म्हणणे खरे नाही की चुकीची माहिती मिळाली होती व त्यामुळे डंपर व आरोपीविरुध्द चुकीची कारवाई केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दिलेली आहे, मी कुठलीही घटना प्रत्यक्षपणे पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरसमजुतीतून डंपर व आरोपीविरुध्द कारवाई केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते

दिनांक : २२/०७/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.